# जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस

P.R.O. Office, Crime Branch, Pune City

**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001

**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police


**प्रेसनोट क्रमांक - ६९२ दिनांक - ०९/१०/२०२१**

कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर

## गावठी पिस्टल व जिवंत काडतुसे जवळ बाळगणा-याला सराईत गुन्हेगारांना अटक

दि.०८/१०/२०२१ रोजी मा.पोलीस आयुक्त सो पुणे शहर यांच्या आदेशाप्रमाणे पुणे शहरात ऑल आउट कोम्बींग ऑपरेशन राबविण्यात आले होते. त्याप्रमाणे कोंढवा पोलीस ठाणे हद्दीतही मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सरदार पाटील, मा.पोलीस निरीक्षक (गुन्हे) जगन्नाथ जानकर, यांच्या सुचनाप्रमाणे तपास पथक अधिकारी पोलीस उप निरीक्षक श्री पी यु कापुरे, पोलीस अंमलदार योगेश कुंभार, अमोल हिरवे, महेश राठोड, गणेश चिंचकर, दिपक जडे, अभिजीत रत्नपारखी, जयदेव भोसले, तुषार आल्हाट असे ऑल आउट कोम्बींग ऑपरेशन करत असताना पोलीस अंमलदार गणेश चिंचकर, योगेश कुंभार यांना बातमीदारामार्फतीने बातमी मिळाली की, कान्हा हॉटेलच्या चौकातील पी.एम.टी. बस स्टॉपच्या जवळ एक चॉकलेटी रंगाचा फुल भायाचा शर्ट घातलेला, केस वाढलेल्या इसमाच्या कमरेला पिस्टल बाळगलेला असुन तो पिस्टल विक्री करण्यासाठी आलेला आहे. मिळालेल्या बातमीप्रमाणे कोंढवा पोलीस ठाणेकडील तपास पथक सदर ठिकाणी ट्रॅप लावुन थांबले असता एक इसम कान्हा हॉटेलच्या चौकातील पी.एम.टी. बस स्टॉपच्या डाव्या बाजुला एक चॉकलेटी रंगाचा फुल भायाचा शर्ट घातलेला, केस वाढलेला कोणाची तरी वाट पाहत असल्याचे दिसला. त्याच्या हालचालींवर लक्ष्य ठेवुन थांबुन राहिले असता काही वेळातच संशयीत इसमास बस स्टॉफच्या उजव्या बाजुने एक इसम चालत येवुन काहीतरी बोलणे करुन ते दोघे तेथुन निघुन जावु लागले त्यावेळी आम्ही त्यास सोबतचे स्टाफचे मदतीने पकडुन त्यांना त्यांचे नांव व पत्ता विचारता त्यांनी त्यांची नावे १)स्वप्नील प्रदिप जगताप, वय २२ वर्षे, खाजगी नोकरी, रा. मु.पो. सुलतानपुर, कमानीखाली, ता. वाई, जि. सातारा २)अमन ईस्माइल सय्यद वय-२१ वर्ष, रा. सय्यदनगर, दादा गुजर इंग्लीश स्कुल श्ेजारी, महंमदवाडी पुणे मुळ रा. मु.पो. बोपर्डी ता. वाई जि.सातारा असे असल्याचे सांगितले. तेव्हा त्यांची अंगझडती घेता स्वप्नील जगताप याचे कमरेला एक देशी बनावटीचे पिस्टल ५०,०००/- रु कि व ४ जिवंत काडतुस ४००/- रु किं. मिळुन आले ते पंचनाम्याने जप्त करण्यात आलेले आहे. आरोपी हयाच्याकडे अग्नीशस्त्राबाबत विचारपुस केली असता आरोपी क्रं.०२ अमन सय्यद याने जवळ बाळण्यासाठी मागणी केल्याने विक्री करण्यासाठी आणले असल्याचे सांगितले आहे. त्यांच्या विरुध्द कोंढवा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.८६४/२०२१ भारतीय हत्यार कायदा कलम.३(२५), ७(२५) महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम ३७(१) सह १३५. गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. त्यांना मा. न्यायालयासमोर हजर केले असता मा. न्यायालयाने दि. ११/१०/२०२१ रोजीपर्यंत पोलीस कोठडी मंजुर केली आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा वरिष्ठाच्या मार्गदर्शनाप्रमाणे पोलीस पोलीस उप निरीक्षक प्रभाकर कापुरे हे करीत आहेत.



महाराष्ट्र पोलीस
पुणे शहर पोलीस
कोंढवा पोलीस स्टेशन
दुरध्वनी क्रमांक : ०२०-२६९३०७८०, ०२०-२६९३२०२०
पुणे पोलीस